**नवी मुंबई महानगरपालिका**

महापालिका सचिव कार्यालय,
नवीन मुख्यालय, ३रा मजला,
बेलापूर,नवी मुंबई-४००६१४,
दिनांक:२८/१२/२०१७.

**स्थायी समिती**
**कार्यक्रम पत्रिका**

स्थायी समितीच्या सर्व सदस्यांना याद्वारे असे कळविण्यात येते की, **स्थायी समितीची साप्ताहिक सभा, बुधवार, दिनांक ०३ जानेवारी २०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता** बेलापूर, भुखंड क्रमांक ०१, सेक्टर १५ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील ४ थ्या मजल्यावरील **स्थायी समिती सभागृहात** पुढील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल:-

१. इतिवृत्त कायम करणे:-१) दिनांक १५/१२/२०१७ रोजीचे.
२. सन्मा. सदस्य श्री. नामदेव भगत याजकडून आलेली ठरावाची सुचना, दि.१५ डिसेंबर २०१७ रोजीची ठरावाची सुचना.
३. सन्मा. सदस्य श्री. नामदेव भगत याजकडून आलेली ठरावाची सुचना, दि.१५ डिसेंबर २०१७ रोजीची ठरावाची सुचना.
४. रुपये पाच लाखापेक्षा जास्त परंतु पंचवीस लाखापेक्षा कमी खर्चाच्या कामासंबंधी केलेल्या कराराबाबत, आयुक्तांचे दिनांक २०/१२/२०१७, चे पत्र क्र.नमुंमपा/परि-२/९१४/२०१७.
५. रुपये पाच लाखापेक्षा जास्त परंतु पंचवीस लाखापेक्षा कमी खर्चाच्या कामासंबंधी केलेल्या कराराबाबत, आयुक्तांचे दिनांक १४/१२/२०१७, चे पत्र क्र.नमुंमपा/शि.वि./२९०४/२०१७.
६. केंद्रशासन पुरस्कृत अभियान अंतर्गत सन २०१७-२०१८ हरित क्षेत्र विकास (Green Space Development) अंतर्गत स्वामी जवळील से. १०अे, वाशी (अमृत अभियान-२०१७-२०१८), आयुक्तांचे दिनांक १९/१२/२०१७, चे पत्र क्र.नमुंमपा/उद्यान/२०४१/२०१७.
७. कोपरखैरणे सेक्टर-४ येथील चॅनल क्लासिक अपार्टमेंट ते प्राजक्ता सोसायटी व रुम नं. ४४१ ते रुम नं. २७३ पर्यंतच्या स्टॉर्म वॉटर ड्रेनची सुधारणा करणेबाबत, आयुक्तांचे दिनांक २०/१२/२०१७, चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./१६०९/२०१७.
८. सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पातील तरतुदींचे पुर्नविनियोजन करणेबाबत,आयुक्तांचे दिनांक ३०/११/२०१७, चे पत्र क्र.नमुंमपा/लेखा/२०९१/२०१७.
९. बेलापूर विभागातील भूखंड क्र. ७२, से-१५ येथे वाहनतळ विकसित करणेबाबत, आयुक्तांचे दिनांक २६/१२/२०१७, चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./१६४०/२०१७.
१०.सन्मा. स्थायी समिती सदस्य श्री. अशोक बाबूराव गुरखे यांजकडून शुक्रवार, दिनांक १० नोव्हेंबर, २०१७ रोजी बोलाविलेल्या सभेचा (तहकूब सभा दिनांक ११ ऑक्टोबर २०१७ रोजीचा अनिर्णित विषय क्रमांक १०) ठराव क्रमांक १६९ बाबत फेरविचार करणेबाबतची सुचना, दिनांक २८ डिसेंबर २०१७.

**मा.सभापतींच्या आदेशावरुन**

सही/-
**(चित्रा बाविस्कर)**
**महापालिका सचिव**
**नवी मुंबई महानगरपालिका**

<u>**स्थायी समिती**</u>

**विषय क्र.०२. (दि.०३ जानेवारी २०१८)**

**श्री. नामदेव भगत, यांजकडून आलेली ठरावाची सूचना, दिनांक १५ डिसेंबर २०१७, चे पत्र.**

१) " महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१२ नुसार) कलम १९४९ चे कलम ७३ (ड) च्या आवश्यकतेनुसार ५,००,०००/- पाच लाख पेक्षा जास्त परंतु रु.२५,००,०००/- पंचविस लाखापेक्षा कमी खर्चाच्या कामासंबंधी केलेल्या करारानुसार जी कामे केली जातात त्या कामाबाबतची निविदा जाहिरात किती ठेकेदारांनी भरली, काम करण्याचा कालावधी व कोणती तांत्रिक बाबी घेतलेल्या आहेत, त्याची सविस्तर माहिती स्थायी समितीच्या विषय पत्रिकेसोबत देण्यात यावी, असे या सभेचे मत आहे.

२. वरील परिच्छेद १ मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात येत आहे.

**विषय क्र.०३. (दि.०३ जानेवारी २०१८)**

**श्री. नामदेव भगत, यांजकडून आलेली ठरावाची सूचना, दिनांक १५ डिसेंबर २०१७, चे पत्र.**

२) "वेगवेगळ्या एच.ओ..डी. ने सादर केलेल्या कामास/ निविदेस आयुक्तांकडून मंजूरीसाठी स्थायी समितीच्या बैठकीत येणारे विषयांमध्ये जी माहिती येते ती अपुरी असेल म्हणून निविदेमधील ए व बी मधील माहिती सोबत जोडावी जेणेकरुन या विषयाबाबत चर्चाकरणे सोपे होईल म्हणून विषय पत्रिकेसोबत शेड्यूल ए व बी सोबत जोडावे, असे या सभेचे मत आहे."

२. वरील परिच्छेद १ मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात येत आहे.

# <u>स्थायी समिती</u>

**विषय क्र.१०. (दि.०३ जानेवारी २०१८)**

**श्री. अशोक बाबुराव गुरखे, यांजकडून आलेली दिनांक २८ डिसेंबर २०१७ ची ठरावाची सूचना.:-**

> " शुक्रवार, दिनांक १० नोव्हेंबर, २०१७ रोजी बोलाविलेल्या सभेचा (तहकूब सभा दिनांक ११ ऑक्टोबर २०१७ रोजीचा अनिर्णित विषय क्रमांक १०) **ठराव क्रमांक १६९ बाबत समितीने घेतलेल्या निर्णयाचा सभेच्या कामकाजविषयक नियमावलीतील नियम-३अ(१२) अन्वये फेरविचार करावा, असे या सभागृहाचे मत आहे.**